कल्याण 'डोंबिवली महानगरपालिका
ठाणे जिल्हा
KALYAN DOMBIVLI MUNICIPAL CORPORATION

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## नगर रचना विभाग

## अटी व शर्ती

सुधारीत बांधकाम परवानगी क्र.: KDMC/TPD/BP/KD/2016-17/01/492
Dt 16/02/2022

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार मौजे–कल्याण, स.नं. ४७, हि.नं. ७अ, ७ब स.नं. ४९, हि.नं. १ मध्ये १२८२०.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर Basic FSI, Ancillary FSI व Premium FSI चा विचार करुन तसेच भाग बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिलेले ७९५७.१९ चौ.मी. क्षेत्र वगळून एकूण ७१५३.१२ चौ.मी. बांधकाम क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करावयास बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक २४/११/२०२१ च्या अर्जास अनुसरुन खालील अटी व शर्तीस अधिन राहून, तसेच सुधारीत बांधकाम नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे वाडे–भिंतीच्या बांधकामासह, सुधारीत बांधकाम प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

बांधकामाचा तपशील :-

इमारत क्र. १ – स्टिल्ट + पहिला मजला ते वीस मजले + एकवीसवा मजला (पै) (रहिवास)

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र २.८.३ नुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करणेपुर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांवर बंधनकारक राहिल

२) UDCPR मधील विनियम क्र.1.5 Savings मध्ये नमूद a to h बाबत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आपणांवर बंधनकारक राहील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) UDCPR मधील Appendix-F नुसार वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे

५) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची विकास परवानगी रद्द समजण्यात येईल.

६) UDCPR मधील विनियम क्र १२.१ ते १२.३ नुसार इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी वास्तुशिल्पकार, Structural Erineer व परवानगीधारक यांचेवर राहिल. याची नोंद घ्यावी.

७) भूखंडाकडे जाण्या–येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. बांधकाम प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल

८) जागेत जुने भाडेकरु असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी मालकाची राहिल व मालक भाडेकरु यांचेमध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहिल.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-2



क.ल.न.-२